कार्यक्रम यशस्वी होऊन भारताची आर्थिक अरिष्टातून सुटका होऊ शकेल.

***

### अभ्यासासाठी प्रश्न

१) उदारीकरणाचा अर्थ सांगून उदारीकरण कसे केले जाते ते सांगा

२) भारत सरकारने उदारीकरणाचे धोरण का स्वीकारले ते सांगून उदारीकरणातील महत्त्वाचे टप्पे सांगा.

३) उदारीकरणाचा अर्थ सांगून उदारीकरणाचा शेती, उद्योगक्षेत्रावर झालेला परिणाम स्पष्ट करा.

४) टिपा लिहा.

अ) उदारीकरणाचे टप्पे

ब) उदारीकरणाची गरज

क) उदारीकरणाचे विदेशी व्यापारावरील परिणाम

ड) उदारीकरणाचे तोटे

***



प्रकरण – १६

# भारतातील खाजगीकरण

## (Privatisation In India)

१९८० च्या दरम्यान जगात खाजगीकरणाचे वारे वाहू लागले. कारण समाजवादी अर्थव्यवस्थेवर आर्थिक विकास साध्य करता येतो याबाबत लोकांचा भ्रमनिरास झाला. त्याचप्रमाणे मिश्र अर्थव्यवस्थेमधील सार्वजनिक क्षेत्राचे असणारे महत्त्व कमी होऊ लागले. याच काळात रशियातील पेरस्त्रोईक (पुनर्निर्माण) ही आर्थिक सुधारणेची लाट व पूर्व युरोपातील राष्ट्रातही पसरली. चीनसारखे कम्युनिस्ट राष्ट्रदेखील या विचाराने प्रभावित झाले. चीनमधील सार्वजनिक क्षेत्राने कार्यक्षमता व उत्पादकता न दाखविल्याने या क्षेत्रात आर्थिक सुधारणा करण्यास चीननेदेखील सुरुवात केली. थोडक्यात, समाजवादी अर्थव्यवस्थेतील दोष कालांतराने दिसून येऊ लागले. मिश्र अर्थव्यवस्थादेखील नोकरशाहीने त्रस्त झाली. यामुळे अर्थव्यवस्था खाजगीकरणाकडे वाटचाल करू लागली. सरकारी उद्योगाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी खाजगीकरण का असाच विचार आज मांडला जातो.

**खाजगीकरण – अर्थ आणि व्याख्या :**

खाजगीकरणाचा अर्थ वेगवेगळ्या प्रकारे लावला जातो. खाजगीकरण म्हणजे सरकारच्या मालकीच्या उद्योगाची मालकी खाजगी व्यक्ती, संस्था यांच्याकडे सोपविणे. काहींच्या मते, खाजगीकरणात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाच्या मालकी हक्कात बदल न करता केवळ व्यवस्थापन आणि नियंत्रण खाजगी व्यक्ती/संस्थांकडे सोपविले जाते. जेव्हा सरकारच्या मालकीच्या उद्योगातील भांडवल खाजगी व्यक्ती, संस्था यांना विकले जाते तेव्हा त्यास खाजगीकरण म्हणतात. खाजगीकरणाचा नेमका अर्थ पाहण्यासाठी, खाजगीकरणाच्या संदर्भात तज्ज्ञांनी दिलेल्या काही व्याख्या अभ्यासणे योग्य ठरते.

**१) बार्बरा ली व जॉन नेलीस** : खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या मालकीत किंवा व्यवस्थापनात खाजगी व्यक्तींना/उद्योजकांना सहभागी करून घेण्याची प्रक्रिया होय. यामध्ये सार्वजनिक उद्योगाची, खाजगी व्यक्ती, संस्था यांच्याकडून पूर्णपणे किंवा अंशतः खरेदीचा समावेश असतो. त्याचप्रमाणे खाजगी व्यवस्थापनाच्या ताब्यात तो उद्योग देण्याच्या निर्णयाचा त्यात समावेश असतो. तसेच सार्वजनिक उद्योगासंबंधी व्यवस्थापनाचा करार, कौलनामा पद्धतीने चालविण्यास देणे (Franchise) भाडेपट्टीने चालविण्यास देणे इ. चा समावेश केला जातो.

(Privataisation is the general process of involving the private sector in the ownership or operation of a state owned enterprise. Thus the term

refers to private purchase of all part of a company. It covers contracting out and the privatatisation of management thorugh management contracts leases or franchise arrangement - T.Barbera Lee & John Nellis)

या व्याख्येवरून खाजगीकरण म्हणजे

* सरकारी उद्योगाची मालकी खाजगी व्यक्तीकडे देणे.
* सरकारी उद्योगाचे व्यवस्थापन खाजगी व्यक्तीकडे देणे.
* सरकारी उद्योग खाजगी व्यक्तीला अंशतः किंवा पूर्णतः विकणे.
* सरकारी उद्योगाशी व्यवस्थापनविषयक करार करणे.
* असा करार भाडेपट्टीने चालविण्याचा किंवा कौलनामा पद्धतीने (Franchise) केला जातो.

**२) डी. आर. पेंडसे** : खाजगीकरण म्हणजे राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे होय

(Privatisation is a process which reduce the involvement of the state or public sector in Country's economic activity.)

**३) डेव्हिड हेरॉल्ड** : खाजगीकरण म्हणजे साधनसामग्रीच्या वाटपासाठी बाजार विरहित पद्धतीऐवजी बाजाराधिष्ठित पद्धतीचा स्वीकार करण्याची पद्धती होय.

वरील व्याख्या अभ्यासल्यावर खाजगीकरणाच्या संकल्पनेत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

* खाजगीकरणात सरकारी उद्योगाची मालकी खाजगी व्यक्ती, संस्थेकडे हस्तांतरित केली जाते.
* खाजगीकरणात सरकारी उपक्रमाचे व्यवस्थापन खाजगी व्यक्ती, संस्थांकडे दिले जाते.
* खाजगीकरणात सरकारचा आर्थिक व्यवहारातील सहभाग कमी केला जातो.
* खाजगीकरणात सरकारी उद्योगात किमान ५०% समभाग खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित केले जातात.
* खाजगीकरणात खाजगी क्षेत्राला सार्वजनिक क्षेत्राचे अधिकार सोपविले जातात.

**खाजगीकरणाच्या पद्धती** :

खाजगीकरणाच्या तीन पद्धती आहेत. त्या म्हणजे –

**१) मालकी हक्कासंदर्भात खाजगीकरण** : या पद्धतीत सार्वजनिक उद्योगाची मालकी सरकारकडून खाजगी व्यक्ती, संस्था यांच्याकडे पूर्णपणे किंवा अंशतः हस्तांतरित केली जाते.

**२) संघटनात्मक उपाय योजनेद्वारे खाजगीकरण** : जेव्हा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या मालकी हक्कात बदल न करता केवळ संघटनात्मक उपाय



योजनेद्वारे खाजगीकरणाचे लाभ मिळवले जातात तेव्हा त्यास संघटनात्मक उपायाद्वारे खाजगीकरण म्हणतात. या पद्धतीत संघटनात्मक उपायाद्वारे सरकारी नियंत्रणे, हस्तक्षेप यावर मर्यादा लादल्या जातात.

**३) कार्यकारी उपायाद्वारे खाजगीकरण** : जेव्हा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविण्यासाठी एकच आहे नि राष्ट्रीयीकरणाच्या (Denalionalisation) उपायाऐवजी कार्यकारी उपाय उपयोगात आणले जातात तेव्हा त्यास कार्यकारी उपायाद्वारे खाजगीकरण म्हणतात. कार्यकारी उपाययोजना याचा अर्थ सार्वजनिक उद्योगात व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करणे होय.

**खाजगीकरणाची प्रमुख कारणे किंवा उद्दिष्टे** :

सध्या जगात खाजगीकरणाची लाट आल्याचे आपण अभ्यासले. खाजगीकरणाची व्याख्या, खाजगीकरण करण्याच्या विविध पद्धती अभ्यासल्यावर खाजगीकरण का केले जाते किंवा खाजगीकरणाची उद्दिष्टे कोणती आहेत ते पाहू. काही प्रमुख उद्दिष्टे कोणती आहेत ते पाहू. काही प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. सरकारी उद्योगांना होणारा तोटा कमी करणे.
२. मुक्त व्यापारी धोरणांचा अवलंब करणे.
३. व्यवस्थापनाचा दर्जा सुधारणे.
४. अविकसित क्षेत्राचा विकास साध्य करणे.
५. सरकारी खर्चाचे ओझे कमी करणे.
६. सरकारचा वाढता खर्च, कर्ज, कराचे दर कमी करणे.
७. सरकारच्या उत्पन्नात वाढ करणे.
८. विकासाचे निर्णय आर्थिक दृष्टिकोनातून घेणे.

**खाजगीकरणाचे फायदे** :

अलीकडच्या काळात जगातील अनेक देशांनी खाजगीकरणाचा अवलंब केला आहे. काही राष्ट्रांना खाजगीकरणाचा लाभ मिळाल्याचे दिसून येते, तर काही राष्ट्रात सरकारी उद्योगाचे खाजगीकरण केल्याने त्याचे दुष्परिणामही दिसून येऊ लागले आहेत. तेव्हा खाजगीकरणापासून मिळणारे लाभ व तोटे यांचा येथे विचार करू या.

**खाजगीकरणाचे अनुकूल परिणाम** : खाजगीकरणाचे काही अनुकूल परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

**१) उत्पादन क्षमतेत वाढ** : खाजगीकरणामुळे उत्पादन क्षमतेत वाढ होते. त्याचा परिणाम उत्पादन खर्च कमी होऊन ग्राहकांना कमी किमतीत वस्तू उपलब्ध होतात. याचाच अर्थ खाजगीकरणामुळे ग्राहकांना कमी किमतीत वस्तू उपलब्ध होऊन ग्राहकांचाही फायदा होतो.

**२) विकासाचा वेग वाढतो** : खाजगीकरणामुळे विकासाची गती वाढते.

जपान, हाँगकाँग सिंगापूर, कोरिया, तैवान इत्यादी देशांचा विकास केवळ खाजगीकरणामुळे झाला. या देशांनी आधुनिक वित्तीय संस्थांचा विकास करून, विविध खाजगी उपक्रमांना अर्थ पुरवठा केला. त्यामुळे खाजगी क्षेत्राच्या विकासाला चालना मिळून आर्थिक विकास झाला.

**३) सार्वजनिक कर्जाचा बोजा कमी करणे** : भारताने रशियाचे अनुकरण करीत, आर्थिक विकास साध्य करण्यासाठी १९५१ पासून आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला. योजनेद्वारे सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार केला. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करताना भारत सरकारने प्रचंड प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक केली; परंतु नियोजनाच्या गेल्या पन्नास वर्षात सार्वजनिक क्षेत्रातील बहुसंख्य उद्योग तोट्यातच राहिले. या क्षेत्रात गुंतविलेल्या भांडवलापासून मिळणारा परतावा फारच कमी होता. या क्षेत्रातील उद्योग बंद केल्यास बेरोजगारी वाढेल, देशात असंतोष निर्माण होईल, अशी भीती सरकारला वाटत होती; परंतु या उद्योगाचे खाजगीकरण केल्यास सरकारी गुंतवणूक बाहेर येईल, या क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी सरकारने जे कर्ज काढले होते ते खाजगीकरणामुळे परत करता येऊ शकेल. म्हणजेच खाजगीकरणामुळे सरकारवरील कर्जाचा भार कमी झाला. मेक्सिको, तुर्कस्थान, पाकिस्तान, न्यूझिलंड इ. राष्ट्रांनी अनेक सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम खाजगीकडे सोपविले. जसे मेक्सिकोने १९८८ मध्ये २३६ सरकारी महामंडळाची खुली विक्री केली. त्यामध्ये नागरी विमान वाहतूक कंपन्या, तांब्याच्या खाणी, पोलाद प्रकल्प इत्यादींचा समावेश होता.

**४) अपव्यय टाळता येतो** : खाजगीकरणाने अनेक अपव्यय टाळता येतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. जसे अमेरिकेत टपालसेवेचे खाजगीकरण केल्यावर ती अधिक जलद व स्वस्त बनली. स्पेन व कॅनडा या देशातील ५०% पेक्षा अधिक टपालसेवा खाजगी क्षेत्रात आहेत.

**५) इतर फायदे** : खाजगीकरणाने उत्पादन अधिक कौशल्याने व कमी खर्चात होते. साधन संपत्तीचा किमान अपव्यय होतो. एवढेच नव्हे तर विविध प्रकारच्या सेवा क्षेत्राचा विकास खाजगीकरणाच्या माध्यमातून अधिक वेगाने होतो, असा अनेक देशांचा अनुभव आहे. जसे अमेरिकेत प्रशासकीय संस्थात वीज व्यवस्था, अग्निशामक व्यवस्था खाजगी क्षेत्रात असल्याने त्यांच्या क्षमतेत वाढ झाली असल्याचे दिसून येते. खाजगीकरणामुळे जे विविध प्रकारचे लाभ मिळतात त्यामुळेच अनेक देशांनी खाजगीकरणाचा उपक्रम स्वीकारला आहे.

**खाजगीकरणाचे तोटे किंवा प्रतिकूल परिणाम** : जगातील अनेक देशांनी खाजगीकरणाचा स्वीकार केल्याने अनेक प्रकारचे लाभ त्यांना मिळाले; परंतु असे असले तरी प्रत्येक देशात खाजगीकरण यशस्वी होईलच असे नाही. खाजगीकरणाचा अवलंब सर्वच क्षेत्रात करता येत नाही. खाजगीकरणामुळे अनेक दुष्परिणाम संभवतात.



खाजगीकरणाचे काही दुष्परिणाम, तोटे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) नफ्याला प्राधान्य** : खाजगी क्षेत्राचा प्रमुख हेतू महत्तम नफा प्राप्त करणे हा असतो. नफा हेतूनेच हे क्षेत्र प्रेरित झालेले असते. त्यामुळे वीज, पाणी, दूध पुरवठा इत्यादी सेवांचा लाभ समाजातील सर्व घटकांना स्वस्तात मिळणार नाही. या सेवा वाजवी दरात लोकांना उपलब्ध व्हाव्यात यासाठी या सेवा उपलब्ध करून देणाऱ्या संस्थांना सरकारतर्फे अनुदान घ्यावे लागेल. असे अनुदान देणे सरकारला परवडणार नाही. सरकारच्या खर्चात वाढ होईल. एवढेच नव्हे तर सध्याच्या काळात जागतिक पातळीवर अनुदानविरोधी वातावरण आहे.

**२) खाजगीकरण कोणत्या उपक्रमाचे करावे हे ठरविणे अवघड** : कोणत्या उपक्रमाचे खाजगीकरण करावे असा प्रश्न सरकारपुढे निर्माण होतो. तोट्यात चालणाऱ्या उपक्रमाचे खाजगीकरण करण्याकडे सरकारचा कल असतो. सरकारचा हा कल खाजगीकरणाच्या धोरणावर मर्यादा निर्माण करतो.

**३) राजकारणी लोकांचा विरोध** : कोणत्याही सार्वजनिक उपक्रमाचे खाजगीकरण करताना त्याचा व्यवस्थापनावर फार मोठा परिणाम होत असतो. त्यामुळे काही सत्ताधारी लोकांना त्यांच्या हितसंबंधांना धक्का बसतो. त्यांचे अधिकार खाजगीकरणामुळे कमी होतात. कामाचे स्वरूप बदलते असे वाटते. त्यामुळे खाजगीकरणात त्यांच्यातर्फे अनेक अडचणी निर्माण केल्या जातात. सरकार दरबारी असलेल्या त्यांच्या प्रभावामुळे खाजगीकरणाला विरोध केला जातो.

**४) खाजगी मक्तेदारी निर्माण होते** : खाजगीकरणामुळे सरकारी मक्तेदारी जाऊन त्याजागी खाजगी मक्तेदारी निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या त्रासात वाढच होण्याची शक्यता निर्माण होते.

**५) इतर तोटे** : खाजगीकरणामुळे बेकारीत वाढ, भ्रष्टाचार, भांडवलाची कमतरता इत्यादी तोटेही निर्माण होतात. त्याचप्रमाणे खाजगीकरण करताना अनेक राजनैतिक अडथळेही येतात. जसे औद्योगिक धोरणात बदल, राजकीय अस्थिरता इत्यादी. स्थिर सरकारच्या अभावी अनेक विकसनशील देशाच्या विकासात अडथळे येत असल्याचे दिसून येते.

वर नमूद केलेल्या दोषांबरोबरच खाजगीकरणासाठी आवश्यक असलेली आधारभूत संरचना सरकार उपलब्ध करून देऊ शकत नाही. तसेच खाजगीकरणासाठी आवश्यक असलेला वित्त पुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्था, बँका यांची प्रगती, अविकसित राष्ट्रात मोठ्या प्रमाणावर झालेली नाही. असे असले तरी देशाची आणि सरकारची आर्थिक स्थिती सुधारण्याचा आणि जलद गतीने विकास साध्य करण्याचे एक साधन म्हणून खाजगीकरणाचा मार्ग अनेक देशांनी स्वीकारला आहे. अनेक देशात खाजगीकरणाचे चांगले परिणाम दिसून येऊ लागले आहेत. थोडक्यात आपणास असे

म्हणता येईल की, प्रत्येक देशाने आपली आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थिती पाहूनच योग्य ती काळजी घेऊनच खाजगीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केल्यास, तिचे चांगले परिणाम निश्चितच दिसून येतील.

**भारतातील खाजगीकरण :**

या प्रकरणाच्या सुरुवातीस आपण पाहिले की, जगात खाजगीकरणाची लाट निर्माण झालेली आहे. साहजिकच या लाटेचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होणे अपरिहार्य आहे. मा. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळात म्हणजेच १९९० मध्ये खाजगीकरणाचे वारे भारतात वाहू लागले. भारतातील सार्वजनिक क्षेत्रात सरकारने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करूनही त्या प्रमाणात परतावा मिळत नव्हता. या क्षेत्रातील अनेक उद्योग तोट्यातच जात होते. या उद्योगांचा तोटा कमी कसा करता येऊ शकेल याबाबत देशातील राजकारणी, विचारवंत चर्चा करीत होते; परंतु या क्षेत्राचे खाजगीकरण करावे याबाबत मात्र मौन पाळत असत. १९९१-९२ अखेरीस भारतातील २४६ सार्वजनिक उद्योगातील गुंतवणूक १९,३१५ कोटी रुपयांची होती. या २४६ उद्योगांपैकी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच उद्योगांना नफा मिळत होता, तर बहुसंख्य उद्योगांना तोटाच होत होता. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना होणारा तोटा भरून काढण्यासाठी सरकार प्रतिवर्षी आपल्या अंदाजपत्रकात ७००० कोटी रुपयांची तरतूद करीत असे. तेव्हा या क्षेत्रात सुधारणा केली जावी यासाठी जागतिक बँक, नाणेनिधी यासारख्या आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांच्या दबावाने भारताला आपल्या भूमिकेत बदल करणे आवश्यक झाले. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचा कारभार सुधारण्यासाठी सरकारला नाईलाजाने का होईना खाजगीकरणाकडे वळावे लागेल. गेल्या दहा वर्षांपासून सरकारने खाजगीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे.

भारत सरकारने जुलै १९९१ मध्ये औद्योगिक धोरण जाहीर केले. या धोरणात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगासाठी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ते म्हणजे -

१) सार्वजनिक क्षेत्रातील निवडक उद्योगात अपगुंतवणुकीचे धोरण स्वीकारले.

२) राखीव क्षेत्रात स्पर्धा निर्माण करणे.

३) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात कामगार व सर्वसामान्य लोकांना सहभागी करून घेणे.

४) सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उद्योगासाठी जे धोरण असेल, त्याच प्रकारचे धोरण खाजगी क्षेत्रातील उद्योगासाठी ठेवणे.

५) आजारी किंवा संभाव्य आजारी, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगासाठी अंदाजपत्रकात राखून ठेवलेली मदत हळूहळू कमी करणे.

६) परस्पर समजुतीचा करार करून कार्यक्षमतेत सुधारणा करणे.

१९९१ च्या नवीन औद्योगिक धोरणाने खाजगीकरणाच्या दृष्टीने पुढील निर्णयांची



अंमलबजावणी करण्यात आली.

**अ) अराखीव (Deservation) :** १९९१ च्या औद्योगिक धोरणाने केवळ आठ उद्योगांना राखीव ठेवण्यात आले व इतर उद्योगांना अराखीव ठेवण्यात आले. राखीव ठेवलेल्या उद्योगात अणु ऊर्जा, कोळसा, लिग्नाईट, खनिजतेल, अशुद्ध लोखंड, मँगनीज, क्रोमियम, जिप्सम, सल्फर, सोने, हिरे, यांच्या खाणी, तांबे, शिसे, झिंक इ. च्या खाणी अणुऊर्जेसाठी लागणारे धातू, रेल्वे, वाहतूक, शस्त्रे व दारूगोळा इत्यादी. या राखीव धोरणात १९९३ मध्ये पुन्हा बदल करण्यात आला. राखीव उद्योगाची संख्या आठवरून सहा करण्यात आली.

**ब) आजारी उद्योगासंबंधीचे धोरण :** १९९१ च्या औद्योगिक धोरणात आजारी उद्योगासंबंधी काही निर्णय घेण्यात आले. या धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगदेखील औद्योगिक वित्त पुनर्रचना मंडळाच्या (B.I.F.R. Board of Industrial and Financial Reconstruction) अधिकारक्षेत्रात आणण्यात आले. एखाद्या आजारी उद्योगाची पुनर्रचना करावयाची असेल किंवा तो उद्योग बंद करावयाचा असेल, तर त्या संबंधीचा निर्णय मंडळ घेईल. १९९८ मध्ये केंद्र सरकारचे १२ व राज्य सरकारच्या १४३ उद्योगाबाबत निर्णय घेण्याचे काम सोपविण्यात आले. यापैकी ३० प्रकरणे आर्थिकदृष्ट्या सबळ नसल्याने ती विसर्जित करण्यात आली. ५० प्रकरणांच्या पुनरुज्जीवन योजनांना मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे केंद्र सरकारची ९०, राज्यांची १९ प्रकरणे बंद करण्याची शिफारस करण्यात आली. मंडळाने दोन केंद्रीय व चार राज्यीय असे एकूण सहा सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उद्योगाचे पुनर्वसन योजना पूर्ण केल्या. हे उद्योग आजारी नाहीत असेही जाहीर केले.

**क) परस्पर समजुतीचा करार :** अशा प्रकारच्या कराराचा उद्देश, उद्योगात असणारी नियंत्रणे कमी करणे, कामगारात, व्यवस्थापनात जबाबदारीची जाणीव निर्माण करणे, ठरवून दिलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यावर भर देणे, अलीकडच्या काळात परस्पर समजुतीचे करार वाढत आहेत. १९९७-९८ मध्ये या करारांची संख्या १०८ एवढी होती. या सर्वांचे मूल्यमापन केले असता ४५ उद्योगांचा दर्जा उत्कृष्ट होता, २५ उद्योग अतिशय चांगले होते. १३ केवळ चांगले, २२ योग्य तर तीनचे मूल्यमापन अपुरे झाले होते. यावरून हे स्पष्ट होते की १९९७-९८ मध्ये परस्पर समजुतीच्या करारावर सह्या केलेल्या उद्योगापैकी ६६% सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा दर्जा अतिशय चांगला आहे.

**ड) नवरत्नाचे धोरण :** सार्वजनिक क्षेत्रातील ज्या उपक्रमाची कार्यक्षमता उत्कृष्ट आहे अशा नऊ उपक्रमांना नवरत्नाचा दर्जा देण्यात आला. या उद्योगांना पूर्णपणे वित्तीय व्यवस्थापकीय स्वातंत्र्य देण्यात आले. काही दिवसांनंतर या नऊ उद्योगात आणखीन उद्योगांचा समावेश करण्यात आला. या उद्योगांचा समावेश करण्यात आला. या

उद्योगांना पुढील प्रकारचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

* सर्व भांडवली खर्चासंबंधीचे निर्णय घेणे.
* देशातून आणि परदेशातून कर्ज उभारणे.
* संयुक्त प्रकल्पाद्वारे नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करणे.
* दोनशे कोटी रुपयांपर्यंत पूर्णपणे मालकीच्या साहाय्यकारी उद्योगात समभाग गुंतविणे.
* उच्च दर्जाच्या संचालकांच्या साहाय्याने मंडळाची पुनर्रचना करणे.
* व्यवस्थापन व कंपनीमधील नोकरवर्ग यांच्याशी संबंधित विविध योजना तयार करणे, त्या पूर्ण करणे.

१९९७ साली सरकारने नफा प्राप्त करणाऱ्या ९७ उद्योगांना वित्तीय व कार्यात्मक स्वायत्तता जाहीर केली. या उद्योगांना भांडवली खर्चाचे कर्ज उभारणीसाठी, संयुक्त प्रकल्पात प्रवेशासाठी तसेच स्वतःच्या मनुष्यबळ धोरणासंबंधी कार्य करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले. त्याबाबत निर्णय घेण्याचा त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आला.

**इ) भागाची निर्गुंतवणूक (Disinvestment of Shares)** : सार्वजनिक क्षेत्रातील जे उद्योग नफा प्राप्त करतात अशा उद्योगातील भागाची निर्गुंतवणूक करणे हे खाजगीकरणाचे मुख्य उद्दिष्ट होते. देशात चलनवाढ न करता, वाढता खर्च भागविण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाच्या अपगुंतवणुकीद्वारे किंवा निर्गुंतवणुकीद्वारे पैसा उभा केला जातो. सरकारने १९९१-९२ मध्ये निर्गुंतवणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. १९९७-९८ पर्यंत या कार्यक्रमाद्वारे ११,३६९ कोटी रुपये मिळतील अशी अपेक्षा होती. तसेच १९९८-९९ मध्ये निर्गुंतवणुकीद्वारे ५००० कोटी रुपये जमा होतील अशी अपेक्षा होती; परंतु प्रत्यक्षात २७२ कोटी रुपयेच जमा झाले. याचाच अर्थ निर्गुंतवणुकीच्या कार्यक्रमाद्वारे सरकारला अपेक्षेप्रमाणे रक्कम जमा करता आली नाही. असे होण्याचे कारण सरकारने हा निर्णय अत्यंत घाईने घेतला, कार्यक्रम राबविण्यासाठी निश्चित अशी योजना नव्हती. तसेच निर्गुंतवणूक केले जाणारे उद्योग स्टॉक एक्स्चेंजवर नोंदविलेही नव्हते. सन २०१०-११ मध्ये सरकारने निर्गुंतवणुकीतून ४०,००० कोटी रुपये प्राप्त करण्याचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्यक्षात सरकारला २२,७६२ कोटी रुपये प्राप्त झाले. सन १९९१-९२ ते २०१०-११ या काळात एकूण ९९,७३८ कोटी रुपयांची निर्गुंतवणूक सरकारने केली.

**ई) निर्गुंतवणूक आयोगाची स्थापना** : १९९३ मध्ये सरकारने सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली निर्गुंतवणूक आयोगाची स्थापना केली. नंतर १९९६ मध्ये जी.व्ही. रामकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली पाच सभासदांची सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणूक आयोगाची रचना केली. या आयोगाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

१) निर्गुंतवणुकीद्वारे सरकारच्या उत्पन्नात भर टाकणे.



२) कामगारांच्या हितांचे रक्षण करणे.

३) उद्योगाची मालकी विस्तृत पायावर आधारित.

४) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना मजबूत करणे.

५) सरकारच्या उत्पन्नात भर टाकणे

या आयोगाने काही उद्योगांची निर्गुंतवणूक करू नये असेही सुचविले. जून २००० मध्ये या आयोगाने १३०० कोटी रुपये तोटा असलेल्या एअर इंडियाच्या खाजगीकरणाची शिफारस केली. सार्वजनिक उद्योगाची पुनर्रचना करावी अशीही शिफारस या आयोगाने केली. प्रत्येक उद्योगाचा विचार करून शिफारस केली.

***

### अभ्यासासाठी प्रश्न

१) खाजगीकरण म्हणजे काय? खाजगीकरणाच्या विविध पद्धती सांगा.

२) खाजगीकरणाची व्याख्या देऊन खाजगीकरणाची प्रमुख उद्दिष्टे सांगा.

३) खाजगीकरणाचे फायदे-तोटे सांगा.

४) खाजगीकरणाची व्याख्या सांगून भारतात १९९१ च्या नवीन औद्योगिक धोरणाने खाजगीकरणाच्या दृष्टीने कोणत्या गोष्टी केल्या?

५) टिपा लिहा

अ) खाजगीकरणाची व्याख्या व अर्थ

ब) खाजगीकरणाचे फायदे

क) खाजगीकरणाचे तोटे

ड) खाजगीकरण आणि आजारी उद्योग

***